## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यपद्धत व मार्गदर्शक सूचना

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| १ | केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/ निमशासकीय आस्थापना मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाचा समावेश | शासन निर्णयातील परिशिष्ट-अ व मुद्दा क्र.४.१६ मध्ये केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/ निमशासकीय आस्थापना किंवा उद्योग किंवा महामंडळ या मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था उदा. मनपा/नपा/नप व जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत व ग्राम स्तरावरील इतर शासकीय/निम शासकीय कार्यालय/संस्था तसेच, केंद्र/ राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था उदा.कृषी व अकृषी विद्यापीठे या आस्थापनांचा सुद्धा समावेश राहील. |
| २ | खाजगी क्षेत्रातील उद्योग मधील आस्थापना | आस्थापना/उद्योग लघु. मध्यम आणि मोठे उद्योग यामध्ये खाजगी अभिमत विद्यापीठे / शैक्षणिक संस्था यांचा समावेश राहील. |
| ३ | उद्योजक/ आस्थापनाची ऑनलाईन नोंदणी करणे | या योजनेंतर्गत इच्छुक उद्योजक/आस्थापना यांनी प्रथम शासन निर्णयातील मुद्दा क्र.३ प्रमाणे योजनेसाठी पात्र असल्याची खात्री करून घ्यावी. पात्र असल्यास https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी सबंधित आस्थापना यांनी मुद्दा क्र.३ मध्ये नमूद कागदपत्रे स्कॅन करून ठेवावीत.<br><br>सबंधित कागदपत्रे स्कॅन केल्यानंतर वरील संकेत स्थळावर जाऊन सबंधित आस्थापना यांनी नोंदणीसाठीची आवश्यक माहिती भरावी व स्कॅन केलेली कागदपत्रे अपलोड करावीत. आवश्यक माहिती भरून सेव्ह केल्यानंतर आस्थापनेची नोंदणी पूर्ण होईल. सदर नोंदणीस सहायक आयुक्त हे पडताळणी करून मंजुरी देतात व त्यांनंतर आस्थापनांना लॉगीन आयडी व पासवर्ड ई-मेलद्वारे प्राप्त होईल.<br><br>**नोंदणीची कार्यवाही सबंधित आस्थापना यांनी स्वत: करावयाची आहे.** यासाठी आवश्यकता असल्यास आस्थापनांनी सबंधित जिल्ह्यातील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र या कार्यालयास संपर्क साधावा. |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| | | **नोंदणीची संपूर्ण कार्यपद्धती उपरोक्त संकेतस्थळावर नमूद करण्यात आली आहे.**<br><br>शासकीय/ निमशासकीय उद्योग/आस्थापना/ महामंडळ/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या बाबतीत किमान ३ वर्षे पूर्वीची स्थापना असावी ही अट लागू राहणार नाही. तसेच, नोंदणीच्या वेळी सबंधित कार्यालयाचा वैध TAN नमूद करावा. |
| ४ | खाजगी उद्योजक/ आस्थापना नोंदणी वेळी आवश्यक कागदपत्रे | शासन निर्णयातील मुद्दा क्र.३ च्या अनुषंगाने खाजगी आस्थापना/ उद्योगांच्या नोंदणीच्या वेळी EPF किंवा ESIC किंवा GST किंवा Certificate of incorporation किंवा DPIT किंवा उद्योग आधार यापैकी एक प्रमाणपत्र अपलोड /सादर करावे.<br>EPF च्या बाबतीत EPF चे प्रमाणपत्र किंवा नजीकच्या काळाचे EPF चलन पोर्टलवर अपलोड करावे.<br><br>तसेच अनुदानित महाविद्यालयाच्या बाबतीत विद्यापीठाचे संलग्नता प्रमाणपत्र / सह-संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडील पद मान्यता प्रमाणपत्र अपलोड/सादर करावी.<br><br>अनुदानित किंवा विना अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकरीता शिक्षणाधिकारी यांच्याकडील संच मान्यता असण्याची पवित्र पोर्टलची प्राचार्य यांची स्व-साक्षांकित प्रत अपलोड/सादर करावी. |
| ५ | उद्योजक/ आस्थापनाद्वारे रिक्तपदे ऑनलाईन अधिसूचित करणे | सदर लॉगीन व पासवर्ड च्या आधारे सबंधित उद्योजक/ आस्थापना यांनी लॉगीन करून पोस्ट Post Vacancy या टॅब वर जाऊन सबंधित आस्थापना यांनी त्यांचे कडील रिक्तपदे अधिसूचित करावीत.<br><br>**रिक्तपदे अधिसूचित करण्याची संपूर्ण कार्यपद्धती उपरोक्त संकेतस्थळावर नमूद करण्यात आली आहे.** |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| | | या योजनेंतर्गत रिक्तपदे अधिसूचित करीत असताना प्रथम खालीलप्रमाणे रिक्तपदांची संख्या निश्चित करावी<br>• **शासकीय/निमशासकीय/महामंडळ/स्थानिक स्वराज्य संस्था - एकूण मंजूर पदाच्या ५%**<br>• **सेवा क्षेत्रातील उद्योग / आस्थापना - एकुण कार्यरत मनुष्यबळाच्या २०%**<br>• **इतर उद्योग / आस्थापना - एकुण कार्यरत मनुष्यबळाच्या १०%** |
| ६ | शासकीय/निमशासकीय/ महामंडळ/स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये एकूण मंजूर पदाच्या ५% गणना | शासकीय/निमशासकीय/महामंडळ/स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये एकूण मंजूर पदाच्या ५% प्रमाणे गणना करताना सबंधित आस्थापनेतील फक्त रिक्तपदे विचारात न घेता सबंधित आस्थापनेतील सगळ्यात वरिष्ठ अधिकारी ते शिपाई पदापर्यंतची सर्व मंजूर पदे विचारात घ्यावी व सदर पदांच्या ५% पदांच्या संख्ये इतके प्रशिक्षणार्थी अर्जदार या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी म्हणून घेता येऊ शकतील.<br><br>केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/ निमशासकीय/ उद्योग/ महामंडळ / स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालयात मंजूर पदसंख्या कमी असल्यास, ५% प्रमाणे गणना केल्यानंतर एका पेक्षा कमी पदे येत असतील तर, अशा प्रकरणी सदर कार्यालयात किमान एक प्रशिक्षणार्थी घेता येऊ शकेल. |
| ७ | उद्योजकांनी प्रशिक्षणार्थी अर्जदार उपलब्ध करून घेणे | संकेतस्थळावर रिक्तपदे अधिसूचित केल्यानंतर सबंधित आस्थापना खालील तीन पद्धतीने प्रशिक्षणार्थी अर्जदार उपलब्ध करून घेऊ शकतात.<br>• संकेतस्थळाद्वारे पात्र उमेवारांची यादी प्राप्त करून घेऊ शकतात.<br>• प्रशिक्षणार्थी अर्जदार रिक्तपदांसाठी ऑनलाईन अर्ज करू शकतात<br>• रोजगार मेळावा / कँप आयोजन करू शकतात.<br><br>वरील प्रमाणे प्रशिक्षणार्थी अर्जदार उपलब्ध झाल्यानंतर सबंधित आस्थापना यांनी प्रशिक्षणार्थी अर्जदार निवड व रुजू करून घेण्यासाठी सबंधित आस्थापनांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील. |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| | | • प्रशिक्षणार्थी अर्जदार निवडीचे निकष व प्रशिक्षणार्थी अर्जदार निवडीची कार्यपद्धती निश्चित करणे.<br>• निवडीनंतर प्रशिक्षणार्थी अर्जदारास प्रत्यक्ष रुजू करून घेण्यापूर्वी सदर प्रशिक्षणार्थी अर्जदार शासन निर्णयातील मुद्दा क्र.२ अन्वये पात्र असल्याची खात्री करणे.<br>• प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणासाठी रुजू होताना वय वर्ष १८ पेक्षा कमी नसावा व ३५ वर्ष पूर्ण होण्यास किमान सहा महिन्याचा कालावधी असावा याची खात्री करणे.<br>• तसेच, प्रशिक्षणार्थी अर्जदाराने NAPS/MAPS या योजनेचा लाभ घेतलेला नाही किंवा सध्या घेत नाही याबाबत खात्री करावी. याबाबत सबंधित प्रशिक्षणार्थी अर्जदाराचे स्वयं घोषणापत्र घेण्यात यावे.<br>• प्रशिक्षणार्थी अर्जदार रुजू करून घेण्यापूर्वी प्रशिक्षणार्थी अर्जदाराने या योजनेचा लाभ यापूर्वी घेतला नाही याची खात्री करूनच प्रशिक्षणार्थी अर्जदारास रुजू करून घेणे. याबाबत सबंधित प्रशिक्षणार्थी अर्जदाराचे स्वयं घोषणापत्र घेण्यात यावे.<br>• प्रशिक्षणार्थी अर्जदार रुजू झाल्यानंतर त्याचा रुजू दिनांक संकेतस्थळावर नमूद करण्याची जबाबदारी सुद्धा सबंधित आस्थापनांची राहील. त्या आधारावर प्रशिक्षणार्थी अर्जदाराचा प्रशिक्षणाचा सहा महिन्याचा कालावधी निश्चित होईल.<br>• आस्थापनाने प्रशिक्षणार्थी अर्जदारास ऑफलाईन पद्धतीने प्रशिक्षणार्थी म्हणून रुजू करून घेतल्यास, सदर प्रशिक्षणार्थी अर्जदाराची संकेतस्थळावर नोंदणी करून घेणे आवश्यक राहील. |
| ८ | प्रशिक्षणार्थी अर्जदार ऑनलाईन नोंदणी | या योजनेंतर्गत सहभागी होण्यापूर्वी इच्छुक प्रशिक्षणार्थी अर्जदाराने प्रथम शासन निर्णयातील मुद्दा क्र.२ प्रमाणे पात्र असल्याची खात्री करून घ्यावी. पात्र असल्यास https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी सबंधित प्रशिक्षणार्थी अर्जदाराने शासन निर्णयातील मुद्दा क्र.२ मध्ये नमूद कागदपत्रे स्कॅन करून ठेवावीत. |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| | | सबंधित कागदपत्रे स्कॅन केल्यानंतर वरील संकेतस्थळावर जाऊन सबंधित प्रशिक्षणार्थी अर्जदाराने नोंदणीसाठीची आवश्यक माहिती भरावी व स्कॅन केलेली कागदपत्रे अपलोड करावीत. आवश्यक माहिती भरून सेव्ह केल्यानंतर प्रशिक्षणार्थी अर्जदाराची नोंदणी पूर्ण होईल व त्यांना लॉगीन व पासवर्ड प्राप्त होईल. **नोंदणीची कार्यवाही सबंधित प्रशिक्षणार्थी अर्जदाराने स्वत: करावयाची आहे.**<br><br>प्रशिक्षणार्थी अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी असावा याचा पुरावा म्हणून अधिवासी दाखला / जन्म प्रमाणपत्र / १० वी चे प्रमाणपत्र अथवा महाराष्ट्रात किमान १५ वर्ष राहिल्याचा पुरावा सादर करावा लागेल.<br><br>**नोंदणीची संपूर्ण कार्यपद्धती उपरोक्त संकेतस्थळावर नमूद करण्यात आली आहे.** |
| ९ | रिक्तपदासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे | प्रशिक्षणार्थी अर्जदार सदर लॉगीन व पासवर्ड च्या आधारे सबंधित उद्योजक/आस्थापना यांनी अधिसूचित केलेल्या रिक्तपदासाठी प्रशिक्षणार्थी अर्जदारा लॉगीन करून जिल्हा/सेक्टर निहाय CMYKPY अंतर्गत रिक्तपदे शोधून सदर रिक्तपदासाठी ऑनलाईन अर्ज करू शकतो.<br><br>**रिक्तपदासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची संपूर्ण कार्यपद्धती संकेतस्थळावर नमूद करण्यात आली आहे.** |
| १० | प्रशिक्षणाअंती प्रशिक्षित प्रशिक्षणार्थीस कायम नोकरीचा हक्क राहणार नाही | शासन निर्णयातील मुद्दा क्र.४.२ प्रमाणे या योजनेंतर्गत **उद्योग/ आस्थापनामध्ये प्रत्यक्ष कार्य अनुभव प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रशिक्षणाअंती प्रशिक्षणार्थीस सबंधित आस्थापना/ उद्योगामध्ये विशेषत: शासकीय/ निमशासकीय/ महामंडळ/ स्थानिक स्वराज्य संस्था या आस्थापनामध्ये कायमची नोकरी मिळण्याचा हक्क राहणार नाही ही बाब या योजनेंतर्गत प्रशिक्षणासाठी रुजू होण्यापूर्वी प्रशिक्षणार्थी अर्जदारास सदर बाब सबंधित आस्थापना यांनी अवगत करून देऊन तसे प्रशिक्षणार्थी अर्जदाराकडून लेखी लिहून घ्यावे.** |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| | | **या योजनेंतर्गत प्रशिक्षणाची व्याख्या खालीलप्रमाणे राहील:**<br>"A period of time during which a student, a newly qualified professional or a recent graduate gets practical experience in a job"<br><br>**या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थीची व्याख्या खालीलप्रमाणे राहील:**<br>"Trainee is defined as a person who is being trained for the job."<br><br>As such trainee candidate will not have any right for the full-time/permanent job. |
| ११ | ऑफलाईन नोंदणी अथवा रिक्तपदे अधिसूचित करणे | संकेतस्थळाच्या अडचणीमुळे उद्योजक/आस्थापनेस ऑनलाईन नोंदणी अथवा रिक्तपदे अधिसूचित करणे शक्य होत नसल्यास अशा अपवादात्मक परिस्थितीत ऑफलाईन पद्धतीने नोंदणी अथवा रिक्तपदे अधिसूचित करण्यात यावीत. तसेच, योजनेंतर्गत प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांना रुजू करून घेता येईल. ***उद्योजक ऑफलाईन नोंदणी***, ***रिक्तपदे अधिसूचित करणे*** व ***प्रशिक्षणार्थी अर्जदार ऑफलाईन नोंदणी*** व ***प्रशिक्षणार्थी अर्जदार रुजू करणे*** सबंधित फॉर्म्स सोबत **परीशिष्ट-१.१, १.२, १.३ व १.४** जोडले आहेत. सदर फॉर्म्स डाऊनलोड करून घेण्याची सुविधा सुद्धा उपलब्ध करून देण्यात येईल.<br><br>**परंतु त्यानंतर त्वरित सबंधित उद्योजक/आस्थापनांनी रुजू करून घेतलेल्या प्रशिक्षणार्थींची ऑनलाईन नोंदणी अथवा रिक्तपदे अधिसूचित करण्याची कार्यवाही करून घेणे अनिवार्य आहे. उद्योजक/आस्थापना नोंदणी व रिक्तपदे अधिसूचित करणे तसेच, प्रशिक्षणार्थी अर्जदारा नोंदणी व प्रशिक्षणार्थी अर्जदाराचा रुजू होण्याच्या दिनांक नोंद करण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. सदर ऑफलाईन सुविधा दि.३१.०८.२०२४ पर्यंत राहील याची नोंद घ्यावी.** |
| १२ | आस्थापनामध्ये किमान २० रोजगार असावा | शासन निर्णयातील मुद्दा क्र.१.३ मध्ये किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना म्हणजे सदर आस्थापनेमध्ये किमान २० |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
| --- | --- | --- |
| | | मनुष्यबळ कार्यरत असल्यास अशा खाजगी उद्योग/ आस्थापना या कार्यप्रशिक्षणासाठी पात्र असतील. परंतू ही अट **शासकीय/ निमशासकीय/ महामंडळ/ स्थानिक स्वराज्य संस्था** या आस्थापनांना लागू राहणार नाही. |
| १३ | विद्यावेतनाची गणना | शासन निर्णयातील मुद्दा क्र.४.१० या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन अनुज्ञेय राहणार नाही असे नमूद आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.<br><br>प्रशिक्षणार्थी महिन्यामध्ये किमान २० दिवस उपस्थित/हजर असेल तर त्याला त्या महिन्याचे १००% विद्यावेतन अनुज्ञेय राहील. तसेच, प्रशिक्षणार्थी २० दिवस अथवा त्यापेक्षा कमी दिवस हजर असला तर प्रतिदिन उपस्थिती दिवसांच्या प्रमाणे (Pro rata basis) विद्यावेतन अनुज्ञेय राहील. (उदा.[विद्यावेतन/ महिन्याचे दिवस] X उपस्थिती दिवस) |
| १४ | विद्यावेतन देयक साठी उद्योजकाने करण्याची कार्यवाही | सबंधित आस्थापनाने प्रत्येक दिवसाची उपस्थितीची नोंद ठेवावी. महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या २ कामाच्या दिवसात प्रशिक्षणार्थीची मासिक उपस्थिती / हजेरी संकेतस्थळावर नोंद करणे अनिवार्य राहील. प्रशिक्षणार्थीच्या उपस्थिती नुसार त्यांना अदा करावयाचे अनुज्ञेय विद्यावेतन संकेतस्थळाद्वारे गणना होऊन देयक तयार होईल. |
| १५ | विद्यावेतन मंजूर करणेबाबत जिल्ह्यातील सहायक आयुक्त यांची जबाबदारी | उद्योजक/आस्थापना निहाय संकेतस्थळावर उपस्थितीची नोंद घेतलेली माहिती व त्या आधारावर तयार झालेले देयक सहायक आयुक्त यांचे लॉगीन मध्ये दिसेल. सहायक आयुक्त सदर प्रशिक्षणार्थीची नोंद केलेली माहिती स्वत: अथवा कार्यालयातील अधिकारी/कर्मचारीद्वारे प्रत्यक्ष भेट/VC/ दूरध्वनीद्वारे कामाच्या दोन दिवसात ५०% खाजगी आस्थापनांची तपासणी करतील व योग्य असल्यास मंजुरी देतील. तपासणीच्या वेळी एखाद्या प्रशिक्षणार्थीची माहिती योग्य नसल्याची खात्री पटल्यास तशी कारणे नमूद करून सबंधित प्रशिक्षणार्थीची उपस्थिती कमी/अधिक करू शकतील अथवा पुनर्तपासणीसाठी सबंधित उद्योजक/ आस्थापनेस पाठवू शकतील. |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| | | ५०% खाजगी आस्थापनांची तपासणी चक्राकार पद्धतीने करतील व कोणत्याही परिस्थितीत सर्व आस्थापनांची तपासणी सहा महिन्याच्या कालावधीत किमान एक वेळा होईल असे अशी दक्षता घेतील. |
| १६ | विद्यावेतन मंजूर करणेबाबत सबंधित विभागाचे उप आयुक्त यांची जबाबदारी | सहायक आयुक्त यांनी तपासलेली माहिती सबंधित विभागाच्या उप आयुक्त यांचे लॉगीन मध्ये दिसेल. उप आयुक्त त्यांचे स्तरावर सदर माहिती स्वत: अथवा कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारीद्वारे प्रत्यक्ष भेट/ दूरध्वनीद्वारे किमान १५% खाजगी आस्थापनांची तपासणी तातडीने करतील व योग्य असल्यास मंजुरी देतील. तपासणीच्या वेळी एखाद्या प्रशिक्षणार्थीची माहिती योग्य नसल्याची खात्री पटल्यास तशी कारणे नमूद करून सबंधित प्रशिक्षणार्थीची उपस्थिती कमी/अधिक करू शकेल अथवा पुनर्तपासणी साठी सबंधित सहायक आयुक्त यांचेकडे पाठवतील. |
| १७ | विद्यावेतन मंजूर करणेबाबत आयुक्तालयातील उप आयुक्त यांची जबाबदारी | सबंधित विभागाच्या उप आयुक्त यांनी तपासलेली माहिती आयुक्तालयातील उप आयुक्त यांचे लॉगीन मध्ये दिसेल. उप आयुक्त त्यांचे स्तरावर सदर माहिती स्वत: अथवा कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारीद्वारे प्रत्यक्ष भेट/ दूरध्वनीद्वारे किमान ५% खाजगी आस्थापनांची तपासणी तातडीने करतील व योग्य असल्यास मंजुरी देतील. तपासणीच्या वेळी एखाद्या प्रशिक्षणार्थीची माहिती योग्य नसल्याची खात्री पटल्यास तशी कारणे नमूद करून सबंधित प्रशिक्षणार्थीची उपस्थिती कमी/अधिक करू शकेल अथवा पुनर्तपासणी साठी सबंधित सहायक आयुक्त यांचेकडे पाठवतील. |
| १८ | विद्यावेतन मंजूर करणेबाबत आयुक्तालयातील सहायक संचालक (लेखा) तथा आहरण व संवितरण अधिकारी यांची जबाबदारी | आयुक्तालयातील उप आयुक्त यांनी तपासलेली माहिती आयुक्तालयातील सहायक संचालक (लेखा) तथा आहरण व संवितरण अधिकारी यांचे लॉगीन मध्ये दिसेल. सहायक संचालक (लेखा) त्यांचे स्तरावर सदर माहिती स्वत: अथवा कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारीद्वारे प्रत्यक्ष भेट/दूरध्वनीद्वारे किमान ५% खाजगी आस्थापनांची तपासणी तातडीनेक रतील व योग्य असल्यास मंजुरी देतील. |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| | | तपासणीच्या वेळी एखाद्या प्रशिक्षणार्थीची माहिती योग्य नसल्याची खात्री पटल्यास तशी कारणे नमूद करून सबंधित प्रशिक्षणार्थीची उपस्थिती कमी/अधिक करू शकेल अथवा पुनर्तपासणी साठी सबंधित सहायक आयुक्त यांचेकडे पाठवतील. |
| १९ | विद्यावेतन मंजूर करणेबाबत आयुक्त यांची जबाबदारी | आयुक्तालयातील सहायक संचालक (लेखा) तथा आहरण व संवितरण अधिकारी यांनी तपासलेली माहिती आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांना त्यांचे लॉगीन मध्ये दिसेल. प्राप्त देयक योग्य असल्याची खात्री करून आयुक्त देयकास मंजुरी प्रदान करतील. प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत प्रशिक्षणार्थीस DBT द्वारे विद्यावेतन अदा केले जाईल याची खात्री करतील.<br><br>उपरोक्त पद्धतीने तपासणी अंती सहायक संचालक (लेखा) पात्र प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतनाचे देयक तयार करून कोषागारात सादर करेल. |
| २० | DBT द्वारे सबंधित प्रशिक्षणार्थी ना विद्यावेतन अदा करणे. | कोषागारात सादर देयकाच्या अनुषंगाने कोषागारातून प्राप्त रक्कम आयुक्तालयाने या योजनेसाठी स्वतंत्रपणे उघडलेल्या बँक खातेमध्ये जमा करण्यात येईल व सहायक संचालक (लेखा) विद्यावेतनाची रक्कम DBT पद्धतीने सबंधित प्रशिक्षणार्थीच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करतील. |
| २१ | जिप/प.सं/ग्रामपंचायत, जिप शाळा/दवाखाना इ. सेवा क्षेत्रात असल्याने २०% प्रमाणे प्रशिक्षणार्थी घेता येतील का? | सदर आस्थापना शासकीय/निमशासकीय असल्याने त्यांना शासन निर्णयानुसार ५% ही मर्यादा लागू राहील. |
| २२ | प्रशिक्षण पूर्णत्वाचे प्रमाणपत्र कोणी द्यावे | प्रशिक्षणाअंती प्रशिक्षण पूर्णत्वाचे प्रमाणपत्र ज्या आस्थापनेमध्ये प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्या आस्थापना देतील. |
| २३ | प्रशिक्षणार्थीची वयोमर्यादा | प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणासाठी रुजू होताना वय वर्ष १८ पेक्षा कमी नसावा व ३५ वर्ष पूर्ण होण्यास किमान सहा महिन्याचा कालावधी असावा. |

| अ.क्र. | मुद्दा | मार्गदर्शक सूचना |
|---|---|---|
| २४ | प्रशिक्षणार्थी चे विद्यावेतन दर. | सदर प्रशिक्षणार्थीची नियुक्ती कोणत्याही विशिष्ट पदावर करावयाची नसून ती “प्रशिक्षणार्थी” म्हणून असेल. त्यामुळे विद्यावेतन हे शासन निर्णयातील मुद्दा क्र.४.७ नुसार प्रशिक्षणार्थीच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे देय राहील. |
| २५ | स्टार्टअप / लघु उद्योग ज्यामध्ये २० पेक्षा कमी मनुष्यबळ कार्यरत असेल अशा आस्थापना/उद्योग यांना सहभागी होता येईल का? | स्टार्टअप / लघु उद्योग ज्यामध्ये २० पेक्षा कमी मनुष्यबळ कार्यरत असेल अथवा २० पेक्षा जास्त मनुष्यबळ आहे. परंतु त्यांची EPF/ESIC या मध्ये नोंदणी नसेल (उदा. उसतोड कामगार/ हंगामी कामगार) तर अशा उद्योग/आस्थापना यांना शासन निर्णयातील मुद्दा क्र.१.३ अन्वये या योजनेचा लाभ घेता येणार नाही. |
| २६ | कामगार कायदे लागू नसल्याबाबत बाबत | शासन निर्णयातील मुद्दा क्र.४.६ अन्वये किमान वेतन कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व आद्योगिक विवाद लागू राहणार नाही. |

शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ४.६ च्या अनुषंगाने कामगार विभागाच्या विविध कायद्या बाबत स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

Various social security legislations and labour regulations have been enacted for the benefit of workers and to protect their interests. As we move ahead with the historic Mukhya Mantri Karya Prashikshan Yojana (CMYKPY), it is essential to clarify which legislations will cover "student trainees." Questions raised in this regard have been squarely answered below:

1. **Coverage under the Employees Provident Fund & Miscellaneous Provisions Act, 1952**: An employee is defined under Section 2(f) of the Act and a trainee is not an employee by the definition provided therein. Further clarification comes via an EPFO Circular/9503 dated 27.07.2022, which says that contributions will not be applicable on stipends paid to the student trainees when On-the-job training is a part of the scheme. Hence, EPF contribution will not be applicable on the student trainees and employers are exempted from the contribution to be made under the The Employees’ Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952.
2. **The Workmen Compensation Act, 1923**: Under Section 2 (n) (ii), “workman” has been defined as any person employed in any such capacity as defined under Schedule II of the Act. However, nowhere has the word: “trainee” been used in the mentioned provisions. Hence, “Student-Trainees” receiving training in any factory/establishment involved in manufacturing process will not be covered under this act and this act shall not be applicable on them.

3. **The Factory Act, 1948:** Under Section 2 (l), "worker" has been defined and applying the rules of literal interpretation, it would be safe to conclude that the definition does not include "trainees". Hence, "Student-Trainees" will not get the benefits of this act. Other labour law legislations that will not be applicable to the student-trainees are highlighted below:
4. **The Industrial Disputes Act, 1947**: Section 2(s) defines 'workman' under the Act and as has been held in many judgments'; latest being the pronouncement by Delhi High Court in M/S Deccan Charters Private Limited Vs Sarita Tiwari wherein the Court held that a trainee/ probationer was not a workman within the meaning of Section 2(s) of the Industrial Disputes Act. Hence, Industrial Disputes Act will not be applicable on the student trainees. •

**The Payment of Bonus Act, 1965**: An employee has been defined under Section 2(13) of the Act and a trainee is not an employee by the definition provided therein. Hence, The Payment of Bonus Act, 1965 will not be applicable on the student trainees.

---